# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभेचे इतिवृत्तांत

दिनांक १०-०२-२०१०

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## १०/०२/२०१० रोजीच्या स्थायी समिती सभेचे (का.प.क्र.२४) इतिवृत्त

दि.०६/०२/२०१० रोजी तहकूब करण्यात आलेली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा दि.१०/०२/२०१० रोजी **मा.सभापती श्री.अब्दुल साजेद अब्दुल सत्तार** यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिका मुख्य कार्यालयातील 'मलिक अंबर स्थायी समिती सभागृह' येथे दुपारी ४.५० वाजता 'वंदे मातरम्' या गिताने सुरू झाली. या सभेस उप आयुक्त(म.) श्री. उध्दव घुगे, नगर सचिव श्री.एम.ए.पठाण यांचेसह संबंधीत अधिकारी तसेच खालीलप्रमाणे सन्माननीय सभासद उपस्थित होते.

०१. श्री. कटकटे सतीश विश्वनाथ
०२. श्री. पाथ्रीकर दत्ताभाऊ अण्णासाहेब
०३. रविकांत काशीनाथ गवळी
०४. श्री. सुरे सिताराम इसराम
०५. श्री. देसरडा प्रशांत सुभाष
०६. श्री. घडमोडे भगवान देवीदास
०७. श्री. पांडे विनायक प्रभाकर
०८. श्री. दामोधर शिंदे
०९. श्रीमती मेहरून्नीसा खान
१०. श्री.सोनवणे कचरू श्रीपत
११. श्री.निमगांवकर प्रल्हाद गणपतराव
१२. सौ. मोमीन सफिया फिरदौस

**संवाद :**

श्री.प्रल्हाद निमगांवकर : सभेला सर्व विभाग प्रमुख ,कनिष्ठ अभियंता हजर असणे आवश्यक आहे.

मा.सभापती : प्रत्येक स्थायी समितीच्या बैठकीत सर्वच अधिकारी हजर नसतात त्यांचे सोयीनुसार हजर असतात.

श्री.प्रल्हाद निमंगावकर : अधिकारी सभेला येत नसतील तर सभा घेवू नये. माझे वार्डातील उदय इंजिनिअरींग या एजन्सीने एक काम घेतले, केले नाही ते करीत नसेल तर दुसऱ्या एजन्सीकडून करून घ्यावे.

श्रीमती मेहरून्नीसा खान :संबधीत सर्व अधिका-यांना बोलवावे त्यानंतर बैठक घेण्यात यावी.

मा.सभापती : संबधीत अधिकारी सभागृहात उपस्थित नाही प्रशासनाचे प्रमुख यांनी सर्व अधिका-यांना सभेला बोलवावे.अधिकारी उपस्थित राहिले नाही तर सभेचे कामकाज होणार नाही.

श्री.कचरू सोनवणे :सन २००८-०९ या वर्षात माझे वार्डात एकही काम झाले नाही.सन २००९-१० मध्ये सिमेंट कॉक्रेटींगचे, नालीवर ढापे टाकण्याचे तसेच ,स्मशानभुमीचे कामाचे टेंडर झाले.विचारणा केली असता ठेकेदार २ टक्के रक्कम भरणा करीत नाही याकडे दुर्लक्ष का होत आहे.

कार्य.अभियंता(श्रीपानझडे):लगेच या संबधीची माहिती नाही १०-१५ मिनीटाचा वेळ दयावा.

श्री.भगवान घडमोडे :मागिल बैठकीत राजेद्रसिंग अजीतसीग एजन्सीला काळया यादीत समाविष्ट करण्याचे प्रस्तावीत केले होते.काय निर्णय घेतला.तसेच माझे वार्डातील गव्हाने नावाचे व्यक्तीने आपल्याकडे कागदपत्र दिले वापर नसतांना त्यांना बील येते त्यांनाही न्याय मिळाला नाही.खुलासा होणे आवश्यक आहे अधिकारी नसतील तर बैठक घेवू नये.

मा.सभापती :संबधीत अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री.प्रल्हाद निमंगावकर :अधिकारी येत नसतील तर बैठक घेण्याला अर्थ नाही.

मा.सभापती :दोन कार्य.अभियंता तसेच लेखाधिकारी हजर नाही त्यांची रजा असेल तर सादर करावे.रजा नसेल तर त्यांचेवर प्रशासन काय कार्यवाही करणार आहे.

श्री.प्रशांत देसरडा :मागिल बैठकीत डांबरीकरणावर चर्चा होवून चौकशी करण्याच्या सुचना दिल्या ३२ टक्के बिलोने काम घेवून एजन्सी काम करीत नाही त्यांना ब्लॅकलिस्ट करण्याची मागणी केली कार्यवाही होत नाही.

मा.सभापती :जे अधिकारी सुचना न देता गैरहजर आहे त्यांना निलंबीत करण्यासाठी काय प्रोव्हीजन आहे त्यांचेवर तात्काळ कार्यवाही करावी.

श्रीमती मेहरून्नीसा खान : लोकसभा, विधानसभा आचारसंहीतेत ४ महिणे गेले कामे करता आली नाही. आताही अधिकारी जागेवर नसतात. सदस्यांनी एका कामासाठी संचिकेच्यामागे फिरणे उचीत नाही. आचारसंहितमध्ये ५-२-२ मध्ये १ कोटीची कामे केली हे अधिकार स्थायी समितीला आहे यात कुणी राजकारण करू नये.

श्री.विनायक पांडे : ८-२-२ ची कामे मंजूर करू नये असे एका लोकप्रतिनिधीने सांगितले असे ऐकण्यात येते.

मा.सभापती :अमुक काम करू नका असे मला कुणीही सांगितलेले नाही.

श्री.भगवान घडमोडे :अजीतसींग एजन्सीला ब्लॅक लिस्ट का केले नाही माझे प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही.

श्री.प्रल्हाद निमंगावकर :अधिकारी उपस्थित का नाही.बैठक घेण्याला अर्थ नाही.

मा.सभापती :जे गैरहजर आहे त्यांचेवर कार्यवाही करावी.नसता ते का हजर नाही खुलासा करावा.

श्रीमती मोमीन सफिया :दिं.५-१२-२००९ च्या सभेत ५-२-२ नुसार कामे करण्याचे मंजूर केले अदयाप कामे का झाली नाही.

श्री.रविकांत गवळी :दिल्लीगेट ते हर्सुल टी पॉईन्ट रस्त्यावर विदयूतीकरणासाठी ३-४ वर्षापासून बजेट मध्ये तरतूद केली जाते कामे होत नाही. आचार संहिता लागण्याची वेळ आली अदयाप प्रस्ताव आलेला नाही. काम होणार की नाही.५-२-२ मध्ये किती व कोणती कामे केली.

मा.सभापती :कोणतेही काम होत नाही.हे योग्य नाही. ५-२-२ मध्ये झालेल्या कामात त्यासाठी मा.आयुक्ताच्या निर्देशानुसार ३ कार्य.अभियंता यांची कमेटी गठीत करणार या बाबतीत निर्णय देणार आहे मा.आयुक्त यांनी जावून कामाची पाहणी करावी.पुढील बैठकीत सादर करावे तो प्रश्न येथे नाही स्थायी कमेटीचे अधिकार आहे ते काम करणे न करणे मा.आयुक्तांचे अधिकार आहे या समितीने सर्व अधिकार मा.आयुक्तांना दिलेले आहे.मा.आयुक्तांनी स्वत:चौकशी करावी.

श्री.रविकांत गवळी :५-२-२ मध्ये कामे करण्याचा निर्णय घेतला प्रशासनाला तो मान्य झाला अजूनही काही संचिका त्या कामाच्या प्रलंबीत असेल त्या मार्गी लागत नाही.

मा.सभापती :बजेट मंजूर केले त्यानंतर बजेटबुक तयार होणेसाठी ४ महिणे लागले ७ महिण्याचा कार्यकाळ गेला प्रशासनाला काम करण्याची इच्छा नाही असे वाटते.

(यावेळी सभागृहात मोठमोठ्याने बोलणे चालू असते. काहीही ऐकू येत नाही.)

श्री.प्रल्हाद निमगांवकर :प्रशासन काम करीत नसेल तर सभा घेवू नये.

मा.सभापती :आजची सभा तहकूब करण्यात येते उद्या दुपारी ५-०० वा.सभा घेण्यात येईल.पर्यत तहकूब करण्यात येते.

या बरोबरच आजची सभा तहकूब केल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**नगर सचिव**

महानगरपालिका औरंगाबाद

****दुसऱ्यांदा तहकुब करण्यात आली. गुरूवार दि.11/2/2010 रोजी दुपारी 5.00 वा. आयोजित केली.**

# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती सभा - (का.प.क्र.-24)

## सु च ना

**दिनांक :- 10/02/2010**

दिनांक 10/02/2010 रोजी तहकुब करण्यात आलेली स्थायी समितीची सभा आता **गुरूवार, दिनांक 11 फेब्रुवारी 2010 रोजी दुपारी 5.00 वाजता** "मलिक अंबर स्थायी समिती सभागृह" येथे आयोजित करण्यात आलेली आहे.

या सभेची विषय-पत्रिका (कार्यक्रम पत्रिका क्रमांक 24) यापुर्वीच वितरीत करण्यात आलेली आहे. कृपया सर्व संबंधीतांनी नोंद घेवुन सभेस वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

**नगर सचिव**
महानगरपालिका औरंगाबाद